सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(२)(२)/२०२२/तेवीस दिनांक : ०५ फेब्रुवारी, २०२४.

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

**विषय :- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा - २०२२**
राज्य कर निरीक्षक संवर्गाचा अंतिम निकाल
**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक ०३४/२०२३

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ (पेपर क्रमांक १) व १४ ऑक्टोबर, २०२३ (पेपर क्रमांक २) या दिवशी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट - ब मुख्य परीक्षा - २०२२ या परीक्षेतील राज्य कर निरीक्षक संवर्गाच्या एकूण ९३ पदांचा अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधीन राहुन दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२४ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये सातारा जिल्हयातील श्री. रोहित मनोहर अहिरेकर, बैठक क्रमांक NM००४११५ हे राज्यात प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून सोलापूर जिल्हयातील श्रीमती सुप्रिया सुभाष टाकळीकर, बैठक क्रमांक NM००३००८ ह्या राज्यात प्रथम आल्या आहेत. मागासवर्गवारीतून धुळे जिल्हयातील श्री. महेंद्र वसंत पाटील, बैठक क्रमांक NM००४१४७ हे राज्यात प्रथम आले आहेत.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत परीक्षेचा अंतिम निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवारांचे गुण (Cut-off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

४. प्रस्तुत निकालात नमुद केलेल्या सर्व शिफारसपात्र उमेदवारांच्या शिफारशी, त्यांनी प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पदासाठीची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरून तपासण्याच्या तसेच आरक्षणाचे दावे/प्रमाणपत्रे विहित प्राधिकरणाकडून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहेत. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास, शासन स्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

६. प्रस्तुत अंतिम निकालात शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे. अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्रमांक ६.४.४ पहावे)

ठिकाण : नवी मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर) (अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.